E-ISSN 2582-5429
SJIF Impact - 6.86

AKSHARA

MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Peer-Reviewed & Refereed International Research Journal
January 2026 / Special Issue 22 / Volume III

One Day National Conference on

Recent Trends in Science & Technology, Commerce & Management, Humanities and Interdisciplinary Studies

Prof. Dr. R. S. Khadayate
Principal

Chief Editor
Dr. Vijayendra V. Patil
Co-ordinator

Executive Editors

Prof. D. S. Patil
Vice-Principal

Dr. A. K. Ghorpade
Organizing Secretary

Dr. V. D. Manvatkar
Organizing Secretary

Dr. A. K. Raut
Convenor

Chief Editor : Dr. Girish S. Koli

Akshara Publication

AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 6.86 / January 2026 / Special Issue 22 / Volume III

Index

अनु.	शोधनिबंधाचे शीर्षक	लेखकाचे नाव	पृ. क्र.
1	राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि द्वितीयभाषा मराठी : काही नोंदी काही निरीक्षणे	डॉ. अण्णा वैद्य	11
2	घुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळांचे प्रकार व प्रारूपाचे विश्लेषण	प्रा. डॉ. दिलीप नी.लांजेवार	15
3	राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि भाषेचे अस्तित्व	डॉ. राजीव के.आरके	19
4	आधुनिक काळातील समाज माध्यमांचा व्यवस्थेवर झालेल्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास	डॉ. रावसाहेब भीमराव नेरकर	23
5	गिग अर्थव्यवस्था : रोजगाराचे स्वातंत्र्य की असुरक्षित भविष्य?	डॉ.बी.एस.भालेराव,	25
6	परभणी जिल्हयातील लोकसंख्या वाढीचा भौगोलिक अभ्यास	डॉ.राहुल धर्माजी नवघरे	29
7	सेवा, साधना आणि समाज : नव-आध्यात्मिक संघटनांच्या सेवाकार्याचे समाजशास्त्रीय विश्लेषण	प्रा.भालचंद्र पाटील प्रा.डॉ.दिलीप चव्हाण	34
8	जागतिक आतंकवाद आणि भारताची भूमिका: एक विश्लेषणात्मक अध्ययन (२०११-२०२४)	प्रा. डॉ. विशाल रवींद्र गवळी	39
9	भावी भू-राजनीतिक बदलांचे भारताच्या सुरक्षेसमोर आव्हान	प्रा. डॉ. देवेंद्र विसपुते	43
10	मराठी कविता आणि संवैधानिक मूल्ये	प्रा. दीपक संतोष पवार	46
11	भारतीय ज्ञान परंपरा आणि भाषा संवर्धन	प्रा. जगदीश अनंत संसारे	49
12	आदिवासी विकास योजनाचा नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या सामाजिक, आर्थिक स्थितीवर झालेल्या परिणामांचा अभ्यास	डॉ. मनोजकुमार ज्योतिराम गायकवाड	51
13	मूलभूत मानवी गरजा आणि शाश्वत समावेशक विकास	डॉ. शायिन यासीन शेख	54
14	हवामान बदल व कृषी अर्थव्यवस्था: भारतातील आर्थिक परिणामांचा अभ्यास	सरला कडू महाले	58
15	विकसित आणि विकसनशील दोन्ही देशांमध्ये वस्त्रोद्योगाचे आर्थिक परिवर्तन: एक तुलनात्मक अभ्यास	हिप्पळगे किशोरी अनिल डॉ.डेंगळे एस.एस	62
16	मराठी भाषा आणि रोजगार संधी	डॉ. संगीता सोमवंशी	67
17	एकविसाव्या शतकात भारतीय सामाजिकतेचा, सांस्कृतिकतेचा नवा परीप अधोरेखित करताना, जगण्याचे कथन कवितेतून मांडणारा काव्यसंग्रह : 'सडक'	डॉ. आर. बी. साखरकर	70
18	मानवतावादी मूल्य जोपासणारी आदिवासी कविता	डॉ.विजयेंद्र विश्वनाथ पाटील	74
19	कोरड्या घशाचा ताळेबंद - एक अध्ययन	प्रा. डॉ.प्रशांत रामदासजी राऊत	79
20	स्त्रीवाद व सत्तापिपासू राजकारणाविषयी अभिव्यक्त होऊन परिवर्तनवादी विचार व वैचारिक चळवळीशी बांधीलकी जोपासणारी कविता": 'बाई आणि लोकशाही'	डॉ.मधुचंद्र लक्ष्मण भुसारे	82
21	नामदेव ढसाळ व दया पवार यांच्या मराठी दलित साहित्यातील संविधान मूल्य	डॉ.दीपक लोटन सूर्यवंशी	85
22	भारतीय ज्ञानप्रणाली आणि मराठी भाषा संवर्धन	डॉ.कुंदा बाळासाहेब कवडे	88
23	भाषा-अध्ययन आणि रोजगारसंधी : जागतिक परिप्रेक्ष्यातील एक विश्लेषणात्मक अभ्यास	डॉ. सुभाष राठोड	90
24	मराठी कविता आणि बदलते वर्तमान ('शाबूत राहो हे लव्हाळे' या कवितासंग्रहाच्या संदर्भात)	डॉ. योगिता आशुतोष पाटील	93
25	बहिणाबाईची गाणी :जीवनदर्शन	डॉ. माणिक माधव बागले	96
26	१९८० नंतर बदलेली मराठी कविता	डॉ. अक्षय घोरपडे	99
27	मराठी ग्रामीण कवितेतील बदलते ग्रामजीवन	प्रा. शशिकांत वि. काळे	103
28	गावातील विषमतेचे चित्रण करणारी कविता	प्रा.डॉ.संभाजी बाबाराव सावंत	106
29	मराठी भाषा आणि आधुनिक संधी	डॉ. रश्मी शेटये तुपे	108
30	मराठी कविता आणि बदलते वर्तमान	प्रा. गणेश विठ्ठल अहिरे	111
31	नवीन शैक्षणिक धोरण 2020 आणि भाषेचे अस्तित्व	डॉ. विद्या रामदास काळवाघे	115
32	21 व्या शतकातील मराठी समीक्षेची वाटचाल	महानंदा श्रीमंत माने	117

AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 6.86 / January 2026 / Special Issue 22 / Volume III

02

बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळांचे प्रकार व प्रारूपाचे विश्लेषण

प्रा. डॉ. दिलीप नी.लांबेवार
भूगोल विभाग प्रमुख
मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम

सारांश :-पर्यटन हे जीवन अनुभव समृद्ध करण्याच्यादृष्टीने महत्त्वाचे आहे. पर्यटनामुळे दृष्टी विशाल बनते चार लोकांशी ओळखी होऊन ज्ञानात भर पडते. जीवनातील आनंद आणि चैतन्य यासाठी पर्यटन महत्त्वाचे ठरते. पर्यटनाच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्रातील विविध प्रकारची पर्यटन स्थळे बुलढाणा पठारावरील प्रदेशात आढळतात. या प्रदेशाची भूपृष्ठरचना, हवामान, वनस्पती व प्राणी गा नैसर्गिक घटकात विविधता आढळते. बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळांचे प्रकार व प्रारूपाचे वितरण या अंतर्गत पठारावरील पर्यटन स्थळांचे धार्मिक, नैसर्गिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक या प्रकारात वर्गीकरण करून या अंतर्गत येणाऱ्या पर्यटन स्थळांविषयी थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच धार्मिक पर्यटन स्थळांना धर्मनिहाय वर्गीकृत करून येथे होत असलेले विविध उत्सव, यात्रा व महोत्सवासंबंधीची माहिती एकत्रित करून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक पर्यटन स्थळांचे काही तरी वेगळेपण आहे ते त्या पर्यटन स्थळाच्या आकर्षणाचे केंद्र ठरत असल्याचे दिसून येते.

बीजसंज्ञा :- पर्यटन, भौगोलिक, धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, कृषी पर्यटन, प्रकार व प्रारूप

१ प्रस्तावना

पर्यटन हे जीवन अनुभव समृद्ध करण्याच्यादृष्टीने महत्त्वाचे आहे. पर्यटनामुळे दृष्टी विशाल बनते चार लोकांशी ओळखी होऊन ज्ञानात भर पडते. जीवनातील आनंद आणि चैतन्य यासाठी पर्यटन महत्त्वाचे ठरते. पर्यटनाच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्रातील विविध प्रकारची पर्यटन स्थळे बुलढाणा पठारावरील प्रदेशात आढळतात. या प्रदेशाची भूपृष्ठरचना, हवामान, वनस्पती व प्राणी या नैसर्गिक घटकात विविधता आढळते. शिवाय वाहतूक, दळणवळण, व्यापार, कृषी या घटकांचा विकास होत असल्यामुळे वाहतूक सोयी सुविधामध्ये वाढ होऊन लहान मोठ्या पर्यटन स्थळांचा विकास होत असल्याचे दिसून येते. बुलढाणा पठाराचा विस्तार व्यापक स्वरूपाचा असून या प्रदेशावर बुलढाणा, अकोला, वाशिम व यवतमाळ या जिल्ह्यांच्या काही भागाचा समावेश होतो. त्यामुळे प्रदेशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत थोड्या फार प्रमाणात सांस्कृतिक घटकात बदल झाल्याचे आढळते.

२ उद्देश-बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळांचे प्रकार व प्रारूपाचे वितरण याचा अभ्यास करण्यासाठी खालील उद्देश लक्षात घेतले आहे.

१) अभ्यास क्षेत्रातील पर्यटन स्थळांचा शोध घेऊन त्यांचे वर्गीकरण करणे.

२) धार्मिक पर्यटन स्थळांचे धर्मनिहाय वर्गीकरण करून पर्यटन स्थळे निश्चित करणे.

३) पर्यटन स्थळांना शासनाने ठरविलेल्या निकषानुसार मिळालेल्या दर्जाचा शोध घेणे.

४) पर्यटन स्थळांच्या प्रारूपाचे वितरण स्पष्ट करणे.

३ तथ्य संकलन व संशोधन पद्धती

बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळांचे भौगोलिक विश्लेषणाकरिता तसेच पर्यटन स्थळांच्या प्रकाराचे प्रारूप व वितरण समजून घेण्याकरिता प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर केलेला आहे. त्यासाठी प्रत्यक्ष पर्यटन स्थळांना भेटी देऊन तेथे येणाऱ्या पर्यटकांच्या मुलाखती व प्रश्नावलीच्या माध्यमातून तसेच त्या पर्यटन स्थळासंबंधी असणारे प्रकाशित साहित्यांचा वापर केलेला आहे. सोबतच बुलढाणा पठारावरील बुलढाणा, अकोला, यवतमाळ जिल्ह्यांच्या डिस्ट्रीक्ट गॅझेटीयरचा उपयोगही माहिती मिळविण्यासाठी केला आहे.याशिवाय पठारावरील पर्यटन स्थळांचे भौगोलिक स्थान निश्चित करण्याकरिता GPS प्रणाली व Google earth map ची मदत घेण्यात आली आहे. तसेच जवळील दोन पर्यटन स्थळातील केंद्रीयता दर्शविण्यासाठी सर्वात जवळचा शेजारी तंत्र पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

४ स्पष्टीकरण-बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळांचे प्रकार व प्रारूपाचे वितरण या अंतर्गत पठारावरील पर्यटन स्थळांचे धार्मिक, नैसर्गिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक या प्रकारात वर्गीकरण करून या अंतर्गत येणाऱ्या पर्यटन स्थळांविषयी थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच धार्मिक पर्यटन स्थळांना धर्मनिहाय वर्गीकृत करून येथे होत असलेले विविध उत्सव, यात्रा व महोत्सवासंबंधीची माहिती एकत्रित करून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक पर्यटन स्थळांचे काही तरी वेगळेपण आहे ते त्या पर्यटन स्थळाच्या आकर्षणाचे केंद्र ठरत असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे पर्यटन स्थळांना शासनामार्फत दिलेला दर्जा व त्यासाठी आवश्यक नियम व अटी यावरून केलेली वर्गवारी मांडण्यात आलेली आहे.

५ बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळांचे प्रकार

बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळांचा अभ्यास करत असताना असे आढळून येते की, या प्रदेशात नैसर्गिक, धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक पर्यटन स्थळे आहेत. त्यामुळे त्या स्थळांना प्रकारानुसार म्हणजेच नैसर्गिक पर्यटन स्थळांना त्या ठिकाणी असलेल्या प्राकृतिक

वैशिष्ट्यांच्या आधारावर विभाजित केले आहे. नदी, सरोवर, तलाव, डोंगररांगा, डोंगर उतार, सपाट-सखल प्रदेश, जंगले व वनसंपदा हे नैसर्गिक घटक पर्यटन स्थळे निश्चित करण्यासाठी आधारभूत मानली जातात. धार्मिक पर्यटन स्थळांच्या निश्चितेसाठी विविध धर्माची जसे हिंदू, मुस्लिम, जैन, लिंगायत या धर्मनिहाय वेगवेगळ्या देवी-देवतांची प्रसिद्ध ठिकाणे वर्गीकृत केलेली आहेत. विविध संत महात्म्यांची समाधी स्थळे सुद्धा भाविकांसाठी वंदनिय असतात, अशा प्रसिद्ध स्थळांचा समावेश धार्मिक पर्यटन स्थळे म्हणून केलेला आहे. तसेच बुलढाणा पठारावर असणारे ऐतिहासिक व सांस्कृतिक पर्यटन स्थळांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळांचे नैसर्गिक, धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक व कृषी पर्यटन स्थळाचे वर्गीकरण केले असता असे दिसून येते की, पठारावर धार्मिक पर्यटन स्थळांची संख्या अधिक (७२.२२%) असून त्या खालोखाल नैसर्गिक पर्यटन स्थळाची संख्या (२०.००%) आहे. सांस्कृतिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळे ५.५५% व कृषी पर्यटन स्थळे १.८५% आहेत. बुलढाणा पठारी प्रदेशात मोठ्या प्रमाणात अनेक लहान-मोठे धार्मिक ठिकाणे आहेत त्यापैकी ३९ प्रसिद्ध धार्मिक पर्यटन स्थळे प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेली आहेत.

५.१ नैसर्गिक पर्यटन स्थळे

पर्यटन हे प्रामुख्याने नैसर्गिक घटकांच्या आकर्षणाशी संबंधित असून पर्यटन विकासाचा प्रमुख आधार आहे. कोणत्याही स्थळाचे नैसर्गिक सौंदर्य हे मानवाच्या मनाला सहज आकर्षित करत असते. नैसर्गिक घटकांमध्ये भूस्वरूप, नदीप्रवाह, हवामान, वनस्पती आणि वन्यप्राणी इ. आकर्षणाचे केंद्र असतात. बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळांमध्ये सहस्रकुंड धबधबा, पैनगंगा अभयारण्य, पुस धरण, इसापुर धरण, इसापुर अभयारण्य, काटेपूर्णा अभयारण्य, लोणार सरोवर, लोणार अभयारण्य ही महत्त्वाची नैसर्गिक पर्यटन स्थळे आहेत. दाट वनस्पती, डोंगरदऱ्या, नदीप्रवाह यामध्ये सुंदर वनक्षेत्र प्रमुख आकर्षण आहे. बुलढाणा पठारावरील अभयारण्यात पर्यटक तासनतास बसून दृश्य सौंदर्यस्थळांचा आनंद घेतात. पावसाळ्यात पठारावरील हिरवीगार अजिंठा वेरूळ पर्वतरांग पाहण्यासारखी असते. तसेच पठारावरून पैनगंगा, काटेपूर्णा, अडाण, अरूणावती, पूस, खडकपूर्णा या लहान-मोठ्या नद्या वाहत असून या नद्यांवर धरणे उभारण्यात आलेली आहे. ही धरणे सुद्धा पर्यटनाच्यादृष्टीने उपयुक्त ठरत आहेत.

बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळाचे नैसर्गिक, धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक व कृषी पर्यटन स्थळाचे वर्गीकरण केले असता असे दिसून येते की, पठारावर धार्मिक पर्यटन स्थळांची संख्या अधिक (७२.२२%) असून त्या खालोखाल नैसर्गिक पर्यटन स्थळाची संख्या (२०.००%) आहे. सांस्कृतिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळे ५.५५% व कृषी पर्यटन स्थळे १.८५% आहेत. बुलढाणा पठारी प्रदेशात मोठ्या प्रमाणात अनेक लहान-मोठे धार्मिक ठिकाणे आहेत त्यापैकी ३९ प्रसिद्ध धार्मिक पर्यटन स्थळे प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेली आहेत.बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळाचे नैसर्गिक, धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक व कृषी पर्यटन स्थळाचे वर्गीकरण केले असता असे दिसून येते की, पठारावर धार्मिक पर्यटन स्थळांची संख्या अधिक (७२.२२%) असून त्या खालोखाल नैसर्गिक पर्यटन स्थळाची संख्या (२०.००%) आहे. सांस्कृतिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळे ५.५५% व कृषी पर्यटन स्थळे १.८५% आहेत. बुलढाणा पठारी प्रदेशात मोठ्या प्रमाणात अनेक लहान-मोठे धार्मिक ठिकाणे आहेत त्यापैकी ३९ प्रसिद्ध धार्मिक पर्यटन स्थळे प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेली आहेत.

५.२ नैसर्गिक पर्यटन स्थळे

पर्यटन हे प्रामुख्याने नैसर्गिक घटकांच्या आकर्षणाशी संबंधित असून पर्यटन विकासाचा प्रमुख आधार आहे. कोणत्याही स्थळाचे नैसर्गिक सौंदर्य हे मानवाच्या मनाला सहज आकर्षित करत असते. नैसर्गिक घटकांमध्ये भूस्वरूप, नदीप्रवाह, हवामान, वनस्पती आणि वन्यप्राणी इ. आकर्षणाचे केंद्र असतात. बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळांमध्ये सहस्रकुंड धबधबा, पैनगंगा अभयारण्य, पुस धरण, इसापुर धरण, इसापुर अभयारण्य, काटेपूर्णा अभयारण्य, लोणार सरोवर, लोणार अभयारण्य ही महत्त्वाची नैसर्गिक पर्यटन स्थळे आहेत. दाट वनस्पती, डोंगरदऱ्या, नदीप्रवाह यामध्ये सुंदर वनक्षेत्र प्रमुख आकर्षण आहे. बुलढाणा पठारावरील अभयारण्यात पर्यटक तासनतास बसून दृश्य सौंदर्यस्थळांचा आनंद घेतात. पावसाळ्यात पठारावरील हिरवीगार अजिंठा वेरूळ पर्वतरांग पाहण्यासारखी असते. तसेच पठारावरून पैनगंगा, काटेपूर्णा, अडाण, अरूणावती, पूस, खडकपूर्णा या लहान-मोठ्या नद्या वाहत असून या नद्यांवर धरणे उभारण्यात आलेली आहे. ही धरणे सुद्धा पर्यटनाच्यादृष्टीने उपयुक्त ठरत आहेत.

५.३ धार्मिक स्थळे-प्राचीन काळापासून व्यक्ती धार्मिक उद्देशाने प्रेरित होऊन धार्मिक कार्य व यात्रा करत आला आहे. पर्यटनामध्ये धार्मिक स्थळांना महत्त्वाचे स्थान आहे. कारण बहुसंख्य पर्यटक धार्मिक उद्देशाने पर्यटनासाठी घराबाहेर पडतात व त्यातूनच इतर प्रकारचे पर्यटन घडून येते. आज धार्मिक महत्त्व असलेल्या प्रत्येक स्थळांकडे मोठ्या प्रमाणात लोक आकर्षित होत आहे. या धार्मिक स्थळांना भेटी देण्याचा उद्देश लौकिक व परलौकिक असा आहे. लौकिक उद्देशामध्ये मनोकामनाची पूर्ती, कष्टाचे निवारण असा होता. परलौकिक उद्देशामध्ये पापापासून मुक्ती किंवा मोक्ष प्राप्त करण्याचा असतो. प्राचीन काळापासून जगाच्या सर्व भागात या उद्देशाने प्रवास केला जातो. या धार्मिक यात्रामध्ये काही अंशी अंधविश्वास व अशिक्षितपणा निश्चितच आढळतो. आज जरी धार्मिक कार्य, यात्राच्या उद्देशांना वैज्ञानिकतेच्या कसोटीमध्ये तोलले जाऊ लागले तरी देखील धार्मिक स्थळे व पर्यटकांच्या संख्येत काहीच फरक पडलेला नाही, स्थळांमध्ये कसलीच कमी पडली नाही. परंतु यात्रा व उद्देशामध्ये परिवर्तन झाल्याचे दिसून येते.

बुलढाणा पठारावर सुद्धा मोठ्या प्रमाणात विविध धर्माची प्रसिद्ध धार्मिक स्थळे आहे. आज या धार्मिक स्थळांच्या विकासात भर पडत जाऊन नावारूपास आल्याचे दिसून येते. बुलढाणा पठारावर सर्वच धर्मियांची कमीअधिक प्रमाणात धार्मिक स्थळे असल्याचे आढळते.

पठारावरील वाशिम शहर हे दक्षिण भारतातील काशी म्हणून प्रसिद्ध आहे. उत्तर प्रदेशातील अलाहाबाद शहरानंतर सर्वाधिक शिव मंदिरे वाशिम शहरात आहेत. तसेच पठारावर प्राचीन काळापासून देऊळगाव राजा, मेहकर, सैलानी दर्गा, चिखली, शिरपूर जैन, पोहरादेवी, कारंजा लाड, मालेगाव, रिसोड, लोणी, डव्हा, नागरतास, तपोवन, पुसद, लोणार, अमरखेड, बुलढाणा इत्यादी ठिकाणी असलेल्या धार्मिक स्थळांना पर्यटक मोठ्या प्रमाणात भेटी देतात.

५.४ सांस्कृतिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळे

पर्यटनाच्या अनेक आकर्षणापैकी ऐतिहासिक पर्यटन स्थळे एक प्रमुख आकर्षण आहे. एखादी व्यक्ती जर कोठे व्यक्तिगत कार्यासाठी, शासकीय कामासाठी किंवा मनोरंजन प्राप्तीसाठी गेली असेल, त्याठिकाणी जर त्याला एखादे संग्रहालय, स्मारक, पौराणिक स्थळ, किल्ले किंवा कर्मभूमी स्थळ याची माहिती मिळाली तर आपल्या कामातून वेळ काढून काही काळ त्या स्थळी जातोच. काही पर्यटकांना ऐतिहासिक घटक, घटना, स्थळ याबद्दल कुतूहल व आस्था असते. प्रत्येक व्यक्तीला आपला इतिहास, ऐतिहासिक माहिती मिळविण्याची जिज्ञासा असते. प्रस्तुत संशोधन प्रदेशात सिंदखेड राजा सारखे ऐतिहासिक महत्त्व लाभलेले स्थळ आहे. पर्यटकांच्या इच्छेची पूर्ती प्रत्यक्ष ऐतिहासिक स्थळांना भेट देऊनच होते. त्यामुळे ऐतिहासिक स्थळे मानवाच्या आकर्षणाचे केंद्र आहे. बुलढाणा पठार नैसर्गिक, धार्मिक पर्यटन स्थळांबरोबरच ऐतिहासिक पर्यटन स्थळांच्यादृष्टीने देखील खूप महत्त्वपूर्ण आहे. या प्रदेशातील वाशिम हे राजा वाकाटकाच्या राजधानीचे शहर म्हणून ओळखले जाते. याशिवाय कारंजा शहराला सुद्धा ऐतिहासिक महत्त्व लाभलेले आहे.

पर्यटनाचा मुख्य उद्देश सांस्कृतिक जीवनाचा आनंद लुटणे आहे. महाराष्ट्राला जसा धार्मिक व ऐतिहासिक वारसा लाभला आहे तसाच वैभवशाली सांस्कृतिक वारसाही लाभला आहे. महाराष्ट्रात बुलढाणा पठारी प्रदेशात सांस्कृतिक संपत्तीचे मोठे भांडार आहे. संस्कृती हा एक व्यापक शब्द असून त्यामध्ये लोकसंस्कृतीची आदर्श आणि मूळ सभ्यता सामावली आहे. हे सर्व लोकांपर्यंत पसरते वाढते आणि संपूर्ण लोकांना संस्कारीत करते. कोणतेही स्थान किंवा प्रदेशातील लोक तेथील लोकजीवन, आचार-विचारापासून निर्माण होते. लोकसंस्कृतीमध्ये शिल्पकला, स्थापत्यकला, साहित्य, उत्सव इत्यादी येतात. महाराष्ट्रातील लोकसंस्कृतीने एक अद्भूत आकर्षण निर्माण केले आहे. जे पर्यटक आणि इतिहासकाराचे आकर्षणाचे केंद्र आहे. यावरून महाराष्ट्राच्या प्राचीन संस्कृतीचे दर्शन घडून येते. जेथे ह्यासांस्कृतिक गोष्टी रूजल्या व वाढल्या तेथेच सांस्कृतिक जीवनाचे ठसे उमटले आहेत. यापैकीच बुलढाणा पठाराच्या पूर्वेस मोठ्या प्रमाणात बंजारा समाजाच्या संस्कृतीचे विविध पैलू पहावयास मिळते. याशिवाय आदिवासीबहुल भागात त्या-त्या जमातीचे सण, उत्सव, आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरतात.

५.५ कृषी पर्यटन केंद्र

मालेगाव तालुक्यातील आमखेडा हे छोटेशे गाव २०°७' उत्तर अक्षांश व ५७°००' पूर्व रेखांशा दरम्यान समुद्रसपाटीपासून ४५७ मीटर उंचीवर वाशिम जिल्हा मुख्यालयापासून १७ कि.मी. अंतरावर आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या या गावाने कृषी पर्यटनाचा आदर्श समोर ठेवला आहे. अविनाश जोगदंड या उच्चशिक्षित तरूणाने स्वतःच्या ४० एकर उजाड माळरानावर मोठ्या नियोजनातून कृषी पर्यटन उभे करण्याचा निर्णय घेतला. या कृषी पर्यटन केंद्रामध्ये असणारा बायोगॅस प्रकल्प आशिया खंडातील सर्वात मोठा प्रकल्प असल्याचे बोलले जाते. गांडूळखत प्रकल्प, शेततळे, देशी गाईचा गोसंवर्धन प्रकल्प, आधुनिक अवजारे, ठिबक व तुषार सिंचन, रोपवाटिका, डेअरी व प्रक्रिया उद्योगासोबतच ओमशांती सेंटर उभारण्यात आले आहे. येथे पर्यटकांना आकर्षित करण्याकरिता रेल्वेगाडीने (Toy Train) शिवारात फेरफटका मारून आणण्याची देखील व्यवस्था करण्यात आली आहे. मुलांना खेळण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीचे खेळणे येथे ठेवण्यात आली आहेत. येथे शेतीविषयक प्रशिक्षणाची सुविधा असल्याने आमखेडा प्रशिक्षणाचेही केंद्र बनले आहे. वैदर्भीय पद्धतीच्या रुचकर जेवणाची व्यवस्था तसेच पर्यटकांसाठी कुटुंबासह आल्यास निवासाची उत्तम व्यवस्था आहे. उजाड माळरानावर साकारलेले हे कृषी पर्यटन केंद्र अधिकाधिक सुविधांनी सुसज्ज करण्याची जोगदंड यांची योजना आहे. विदर्भातील युवकांसमोर पर्यटन व्यवसायाचे मॉडेल असेल असा प्रकल्प विकसित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. येथे वाशिम-अकोला जिल्ह्यातील पर्यटक, शाळेच्या सहली, कृषी अभ्यासक तसेच महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यातून सुद्धा पर्यटक या ठिकाणी भेट देण्यासाठी येतात.

६. निष्कर्ष-बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळांचे प्रकार व प्रारूपाचे वितरण अभ्यासता असे आढळून येते की, बुलढाणा पठारावरील नैसर्गिक, धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक पर्यटन स्थळे असली तरी धार्मिक पर्यटन स्थळांची संख्या सर्वाधिक असल्याचे दिसून येते. लोणार हे एकमेव आंतरराष्ट्रीय स्तरावरील नैसर्गिक पर्यटन स्थळ आहे. येथे संपूर्ण भारतातूनच नाही तर इतर देशातून सुद्धा पर्यटक मोठ्या प्रमाणात येतात. कारण पर्यटकांमध्ये लोणार सरोवराविषयी असलेल्या कुतूहलामुळे संशोधक व अभ्यासक या ठिकाणी भेटी देतात. तसेच पर्यटकांची आस्था असणारे अन्य स्थळे शिरपूर जैन, पोहरादेवी, वाशिम, कारंजा, मेहकर, देऊळगाव राजा, डव्हा, लोणी हे महत्त्वपूर्ण धार्मिक पर्यटन स्थळे आहेत. हिंदू धार्मिक स्थळांबरोबरच मुस्लीम धर्मियाचे श्रद्धास्थान असलेले सैलानी बाबा दर्गा, पिर बाबा दर्गा, जान बाबा दर्गा प्रसिद्ध आहेत. तसेच जैन धर्मियांची काशी म्हणून प्रसिद्ध असलेले शिरपूर जैन हे सुद्धा बुलढाणा पठारावरील महत्त्वाचे धार्मिक पर्यटन स्थळ आहे. नैसर्गिक पर्यटन स्थळांमध्ये ज्ञानगंगा, काटेपूर्णा आणि पैनगंगा अभयारण्य सुद्धा पर्यटनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. अभ्यास क्षेत्रातील सिंदखेड राजा येथील राजवाडा व जिजामाता यांचे जन्म ठिकाण ऐतिहासिक पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. पठारावरील सर्वाधिक प्रसिद्ध पर्यटन स्थळ लोणार असून येथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या दिवसेदिवस वाढत असून जगातील विविध देशातून मोठ्या संख्येने अभ्यासक, पर्यटक भेट देण्यासाठी येतात. त्यामळे पठारावरील लोणार जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध होत आहे.

निष्कर्ष

बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळांचे प्रकार व प्रारूपाचे वितरण अभ्यासता असे आढळून येते की, बुलढाणा पठारावरील नैसर्गिक, धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक पर्यटन स्थळे असली तरी धार्मिक पर्यटन स्थळांची संख्या सर्वाधिक असल्याचे दिसून येते. लोणार हे एकमेव आंतरराष्ट्रीय स्तरावरील नैसर्गिक पर्यटन स्थळ आहे. येथे संपूर्ण भारतातूनच नाही तर इतर देशातून सुद्धा पर्यटक मोठ्या प्रमाणात येतात. कारण पर्यटकांमध्ये लोणार सरोवराविषयी असलेल्या कुतूहलामुळे संशोधक व अभ्यासक या ठिकाणी भेटी देतात. तसेच पर्यटकांची आस्था असणारे अन्य स्थळे शिरपूर जैन, पोहरादेवी, वाशिम, कारंजा, मेहकर, देऊळगाव राजा, डव्हा, लोणी हे महत्त्वपूर्ण धार्मिक पर्यटन स्थळे आहेत. हिंदू धार्मिक स्थळांबरोबरच मुस्लीम धर्मियाचे श्रद्धास्थान असलेले सैलानी बाबा दर्गा, पिर बाबा दर्गा, जान बाबा दर्गा प्रसिद्ध आहेत. तसेच जैन धर्मियांची काशी म्हणून प्रसिद्ध असलेले शिरपूर जैन हे सुद्धा बुलढाणा पठारावरील महत्त्वाचे धार्मिक पर्यटन स्थळ आहे. नैसर्गिक पर्यटन स्थळांमध्ये ज्ञानगंगा, काटेपूर्णा आणि पैनगंगा अभयारण्य सुद्धा पर्यटनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. अभ्यास क्षेत्रातील सिंदखेड राजा येथील राजवाडा व जिजामाता यांचे जन्म ठिकाण ऐतिहासिक पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. पठारावरील सर्वाधिक प्रसिद्ध पर्यटन स्थळ लोणार असून येथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या दिवसेदिवस वाढत असून जगातील विविध देशातून मोठ्या संख्येने अभ्यासक, पर्यटक भेट देण्यासाठी येतात. त्यामळे पठारावरील लोणार जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध होत आहे.

संदर्भ सूची

१) District Gazetteer of Maharashtra State Central Provinces District Gazetteer, Akola.
२) District Gazetteer of Maharashtra State Central Provinces District Gazetteer, Buldhana.
3) District Gazetteer of Maharashtra State Central Provinces District Gazetteer, Yevatmal.
४) अकोला जिल्हा, "सामाजिक आर्थिक समालोचन", (२०१०) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.
५) वाशिम जिल्हा, "सामाजिक आर्थिक समालोचन", (२०१०) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.
६) बुलढाणा जिल्हा, "सामाजिक आर्थिक समालोचन", (२०१०) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.
७) यवतमाळ जिल्हा, "सामाजिक आर्थिक समालोचन", (२०१०) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.
८) सिरसाट मोहन (२००४), "वाशिम जिल्ह्याचा इतिहास", संकेत प्रकाशन,वाशिम, पृ.क्र. ४५,२७०,२७९,२८६,२९४,३००.
१) कुंटे मोरेश्वर के. व सौ. कुंटे विजया (२००३), "देवदर्शन जिल्हा यवतमाळ", मंदिर कोश प्रकाशन, विठ्ठल नगर कॉलनी आनंद नगर पुणे.